सोमवार, दि. १६ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३११ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना जिल्ह्यातील १०० कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याचा पर्दाफाश!


## आमदार बबनराव लोणीकर यांचा भ्रष्टाचाराविरुद्ध लढा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी अनुदानाच्या नावाखाली झालेल्या १०० कोटींच्या महाघोटाळ्याने प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराचा कळस गाठला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी या घृणास्पद कृत्याचा पर्दाफाश करत अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यांमध्ये बनावट शेतकऱ्यांच्या नावाने कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. या घोटाळ्यामागे भोकरदन आणि अंबडचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांचा थेट सहभाग असल्याचा त्यांचा दावा आहे. केवळ तलाठी, ग्रामविकास अधिकारी आणि कृषी सहाय्यकांवर निलंबनाची कारवाई करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याचा हा घृणास्पद डाव असल्याचे लोणीकर यांनी ठणकावले आहे.

१४ जून २०२५ रोजी जालना येथील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांच्या उपस्थितीत आमदार लोणीकर यांनी प्रशासनाच्या भ्रष्टाचारावर जोरदार हल्ला चढवला. हा घोटाळा म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार आहे. ज्या शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे सर्वस्व गमावले, त्यांच्या हक्काच्या अनुदानावर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी, असे लोणीकर यांनी संतप्तपणे सांगितले. त्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांचे तात्काळ निलंबन, एसआयटीमार्फत सखोल चौकशी, दोषींना तुरुंगवास आणि अपहाराची रक्कम वसूल करण्यासाठी मालमत्तेवर बोजा टाकण्याची मागणी लावून धरली आहे.

**जिल्ह्यातील आमदारांचा एकजुटीने लढा**

लोणीकर यांनी जालना जिल्ह्यातील सर्व चार आमदारांना सोबत घेऊन विधानसभेत हा मुद्दा प्रखरपणे मांडण्याचा आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या हक्कासाठी झुंजणार आहोत. भ्रष्टाचार्यांना



कोणत्याही परिस्थितीत माफ करणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**३४.९७ कोटींचा अपहार उघड, १०० कोटींचा दावस**

जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतिम अहवालानुसार, अतिवृष्टी अनुदानात ३४.९७ कोटींचा अपहार झाल्याचे उघड झाले असून, यात ७४ कर्मचाऱ्यांवर दोष ठेवण्यात आला आहे. मात्र, लोणीकर यांचा १०० कोटींच्या घोटाळ्याचा दावा स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही केला आहे, जो अधिकृत आकड्यापेक्षा जास्त आहे. यामुळे स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशीची गरज अधोरेखित होते. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये गेल्या पाच वर्षांतील अनुदान वाटपाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे या महाघोटाळ्याचा पूर्ण पडदा उघडण्याची शक्यता आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांना संरक्षण?**

लोणीकर यांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांना संरक्षण मिळत असल्याचा आरोप अत्यंत गंभीर आहे. सध्याच्या चौकशीत तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांवर कारवाई झाली असली, तरी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांवर कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. यामुळे प्रशासनातील भ्रष्टाचाराच्या मुळाशी असलेल्या मोठ्या माशांना पकडण्यासाठी सीबीआय किंवा एसआयटी चौकशी अपरिहार्य आहे. अपहाराची रक्कम वसूल करण्यासाठी दोषींची मालमत्ता जप्त करणे कायदेशीरदृष्ट्या शक्य आहे, परंतु यासाठी त्वरित आणि कठोर कायदेशीर कारवाई आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लढा**

हा घोटाळा केवळ आर्थिक अपहार नाही, तर शेतकऱ्यांच्या विश्वासाचा आणि त्यांच्या हक्काचा खून आहे. लोणीकर यांच्या मागण्या शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णायक ठरू शकतात, परंतु यासाठी पारदर्शक आणि नि:पक्ष चौकशी आवश्यक आहे. विधानसभेत हा मुद्दा उपस्थित झाल्यास सरकारवर दबाव वाढेल आणि दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमधील अनुदान वाटपाच्या चौकशीमुळे आणखी गैरप्रकार उघड होऊ शकतात.

जालना जिल्ह्यातील शेतकरी हा घोटाळा सहन करणार नाही. आम्ही प्रत्येक भ्रष्ट अधिकाऱ्याला उघडा करू आणि शेतकऱ्यांचा एक-एक पैसा परत मिळवू. सरकारने तात्काळ सीबीआय चौकशीचे आदेश द्यावेत, अन्यथा आम्ही विधानसभेपासून रस्त्यापर्यंत लढा देऊ!

# ढवळेश्वर रस्ता बनला धोकादायक; कडबा घेऊन जाणारी लोडींग उलटली



## प्रशासन काय जीवीतहानीची वाट पाहत आहे का? वाहनधारकांचा प्रश्न

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या तीन वर्षांपासून ढवळेश्वर परिसरातील खड्डेयुक्त रस्त्याचे काम करण्याची करण्याची मागणी होत असतांना देखील याकडे मनपा प्रशासनासह जिल्हा प्रशासनाने अद्यापही दुर्लक्ष केलेले दिसून येत आहे. या मार्गावरील रस्त्यावरील खड्ड्यात पाणी साचल्यामुळे वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे दररोज वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच कडबा घेऊन जाणारे एक लोडींग वाहन या खड्ड्यात उलटल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. आता तरी झोपेत असलेले प्रशासन जागे होणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून या रस्त्याचे काम करण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधी एखाद्याचा जीव जाण्याची वाट पाहत आहे का? असा प्रश्न वाहनधारक व परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या गंभीर विषयी आता लोकप्रतिनिधींसह जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# पावसाळ्याच्या सुरवातीलाच पूर्णा पात्रात भक्कम पाणी

## खडकपूर्णा धरणाला होणार फायदा



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** या भागात चांगला पाऊस सतत सुरू असल्याने या भागातील सगळ्या लहान मोठ्या नदी नाले भर भरून वाहत असून या भागातील सर्वच विहिरी जवळपास अर्ध्या आल्या असून सगळी कडे शेतात पाणीच पाणी दिसत आहे. या सतत पाणी शेती मध्ये वापसा नसल्याने कोणतीच कामे होत नसून पेरणी सुद्धा लांबणीवर पडली आहेत. त्या मुळे पाऊस जरी मृग नक्षेत्रात असला तरी पेरणी तरी अजून झालेली नाही.हा पाऊस चांगला असून या मुळे पुढे पिकांना चांगला फायदा होणार आहे. गेल्या **पान २ वर**

# मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात देश विकासाच्या दिशेने वेगाने पुढे सरकला - माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षाच्या यशस्वी कार्यकाळात भारताने सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाचा एक नवीन आर्दश उभा केला. गेल्या ११ वर्षांत देश विकासाच्या दिशेने वेगाने पुढे सरसावला असल्याचे प्रतिपादन भाजपा जेष्ठ नेते व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केले.

जालना येथे भाजपा जिल्हा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत श्री. दानवे बोलत होते. यावेळी पत्रकाराशी बोलतांना दानवे म्हणाले की, ११ वर्षाच्या कार्यकाळामध्ये केंद्र सरकारने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला तर , विकासाला गती मिळते भाजपा सरकार जेथे जेथे आहे, तेथे तेथे गरीबांचा विकास झाला आहे सरकार म्हणजे सेवा, या हेतूने आता काम केले जात आहे तसेच सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे.

गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणूस, अधिकारी हे कसे शक्य आहे, हे शक्यच नाही. असे म्हणत असे. आता गेल्या ११ वर्षातील मोदी सरकारने केलेली कामे बघता, ऋऋहोय, हे शक्य आहे, हे झालेच पाहिजे, मोदी सरकार असल्यामुळे हे नक्कीच होणारऋऋ, असे सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने म्हणून लागला आहे.

२०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराने पोखरला होता देशात अनेक घोटाळे घडत होते. देशात लांगुलचालनाचे राजकारण सुरू होते. मोदी सरकारने मात्र



देशात विकासाचे युग सुरू केले. २०१४ पूर्वी सरकारी योजनांचे लाभ लाभार्थी जनतेपर्यंत पोहचत नसत. लाभार्थी जनतेला हे लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांकडे जावे लागे. मोदी सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाच्या थेट बँक खात्यात लाभ पोहचवण्याचे काम केले आहे. २०१४ पूर्वी सामान्य **पान २ वर**

# इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांना सेवानियम लागू करावेत

## मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील प्रशिक्षित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी सेवानियम लागू करावेत अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष.श्री रमेश आंधळे व जिल्हा सचिव.श्री संजय येळवंते. यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. याशाळेवर हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. या शिक्षकांच्या सेवेला ना संरक्षण आहे ना यथास्थिती वेतन आहे. त्यामुळे या शाळेत कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव आहे. आर्थिक विवंचनेत असलेला उपाशी पोटी आणि सेवासुरक्षा नसल्याने असुरक्षिततेची भावना असलेला शिक्षक ही या राज्याची शोकांतिका आहे. या शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधे असंतोष निर्माण होत आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे व व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या नेतृत्वाखाली यासाठी प्रचंड आंदोलन उभारण्यात येणार आहे.दर्जेदार शिक्षणासाठी राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांना सेवासंरक्षण व प्रचलित नियम व कायद्यानुसार वेतन देण्यात यावे आणि संघर्ष व अप्रिय घटना टाळाव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व जिल्हा सचिव श्री संजय येळवंते यांच्यासह केंद्रीय जिल्हा मार्गदर्शक प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, केंद्रीय कार्यकारीणी सदस्य प्रेमदास राठोड,आरेफ कुरेशी,उपाध्यक्ष जगन वाघमोडे, भीमाशंकर शिंदे, कार्याध्यक्ष फरकूंद अली सय्यद, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,प्रद्युम्न काकड, हकीम पटेल, **पान २ वर**

# सोतोकान कराटे परतूरच्या कराटे संघाचे घवघवीत यश

**परतूर । प्रतिनिधी -** २३ वी इंटरनॅशनल स्पोर्टस जीत कुणे डो.चॅपिंयनशिप मुंबई इंडिया, २०२५,च्या वतीने मुंबई येथील अंधेरी कॉम्प्लेक्स आजाद नगर मेट्रो स्टेशन अंधेरी वेस्ट मुंबई ला कराटे टोर्णामेंट आयोजित दि.१५/०६/२०२५ रोजी घेण्यात आली होती.या टोर्णामेंट मध्ये एकुण तीस-पस्तीस च्या आसपास कराटे टिमणे आपला सहभाग घेतला होता.यामध्ये परतूर येथील सोतोकान कराटे डो इंडिया टिम सहभागी झाली होती.सोतोकान कराटे विध्यार्थी यांनी या स्पर्धेत आपल्या प्रदर्शनाने उपस्थित चाहत्यांचे मनजींकले या वेळी सोतोकान कराटे टीमने सहा मेडल व ग्रुप ट्रॉफी प्राप्त करण्यात यशस्वी झाले. आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ट्रॉफी पण देण्यात आली आहे. तीन गोल्ड मेडल आणि तीन सिल्वर मेडल, आयान खान गोल्ड मेडल, रेहान शेख, गोल्ड मेडल, शेख मोहम्मद मलिक, गोल्ड मेडल,मसद्दीकी शेख, सिल्व्हर मेडल, शिवम मोताळे, सिल्व्हर मेडल, आदीत्य प्रधान, सिल्व्हर मेडल, सर्वांणी घवघवीत यश प्राप्त करून परतूर शहराचे नाव लौकीक केले आहे.असे मत शहरातील प्रतीष्टीत नागरीक गंगाधर पवार,व लॉयन्स क्लबचे अध्यक्ष, मनोहर खालापूरे, डॉ. तापडीया, डॉ .नंद. यांनी सर्व टिमचे अभिनंदन केले आहे.यावेळी कराटे मास्टर माणिक जैस्वाल यांचे मार्गदर्शन सर्व कराटे विध्यार्थी यांना लाभले होते. यशस्वी होण्यासाठी विध्यार्थींनी मोलाची कामगिरी बजावली आहे. या करिता परतूर शहरात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



## संपादकीय

# चिंताजनक विमान दुर्घटना

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ - ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे. हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमनता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारततही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे. तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**


# सेवानिवृत्ती नंतर कर्मचाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करण्याची मुभा; तर बेरोजगारांनी घरी बसायचं काय?


सरकारने निवृत्ती नंतरही कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येईल असा निर्णय सरकारने नुकताच घेवून बेरोजगारी वाढविण्यास बळ दिल्याचे दिसून येते.निवृत्तीनंतर सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांना का म्हणून सेवेत ठेवायचे? निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहा महिने अगोदर जर नवीन कर्मचारी नियुक्त केले तर त्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे संपूर्ण काम नवीन व्यक्ती सहा महिन्यांत सहज काम शिकुन करू शकतो.मग सरकार निवृत्त कर्मचाऱ्यांचे लाड का करीत आहे? देशासह राज्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाणात वाढत असून मोठे सावट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत सरकार जर अशा पध्दतीचे चुकीचे निर्णय घेत असेल तर राज्याची जनता कधीच माफ करणार नाही.कारण सरकारचे असेही म्हणणे आहे की निवृत्त कर्मचाऱ्यांला करार पद्धतीने वयाच्या ६५ वर्षांपर्यंत काम करता येईल जर आवश्यकता भासली तर वयाच्या ७० वर्षांपर्यंत सुध्दा करता येईल.म्हणजे यावरून आपण समजू शकतो की सरकार कडून बेरोजगारांवर कीतीमोठा घणाघाती प्रहार आहे हे आपल्या लक्षात आलेच असेल.त्यात महत्वाचे म्हणजे करार पध्दतीने नियुक्त झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतनही सरकारने अवाढव्य ठेवले आहे निवृत्तीच्या वेळी असलेले मुळ वेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम ही करार पद्धतीने नियुक्त अधिकाऱ्यांना पारिश्रमिक म्हणून दिली जाईल म्हणजेच त्या अधिकाऱ्यांचे वेतन जवळपास ८० ते ९० हजार राहील आणि याचे प्रायश्चित्त राज्यातील बेरोजगार युवकांना भोगावे लागेल.त्यामुळे सरकारने निवृत्त कर्मचाऱ्यांबद्दल किंवा अधिकाऱ्यांबद्दल जो करार पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे तो बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात नुकसान पोचविणारा असुन अत्यंत घातक व चिंताजनक आहे. यावर सरकारने पुनर्विचार करून करार पद्धतीने निवृत्त कर्मचाऱ्यांना घेण्याचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा असे मला वाटते.कारण राज्यात महागाई, बेरोजगारीसह अनेक जटील समस्या आहेत त्यात जत निवृत्त कर्मचाऱ्यांना सरकारनी करार पद्धतीवर जर सामावून घेतले तर आणखी गंभीर समस्या निर्माण होतील हेही तितकेच सत्य आहे. निवृत्तीनंतरही करार पद्धतीने घेण्याच्या सरकारच्या निर्णयाला कर्मचारी/अधिकारी संघटनांकडून सुध्दा विरोध होत आहे आणि विरोध करने सहाजिकच आहे.सरकारच्या या निर्णयाला संघटनाच काय तर राज्याची १४ कोटी जनताही विरोध करेल. एककडे कर्मचारी संघटना निवृत्ती वय ५८ वरून ६० करण्याची मागणी करीत आहे.या मांगणीचा सरकार कडाडून विरोध करत सरकार म्हणत आहे की,५८ वर्षांनंतर कर्मचाऱ्यांची काम करण्याची क्षमता तेवढी राहत नाही, असे कारण देत राज्य सरकार निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यास मंजुरी देत नाही,तर मग प्रश्न उपस्थित होतो की, वयाच्या ६५-७० वर्षापर्यंत त्यांची सेवा कशी काय घेता येईल,असाही मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे. सरकार एकीकडे सांगते की ५८ वर्षांनंतर त्या व्यक्तीची काम करण्याची क्षमता कमी असते आणि दुसरीकडे निवृत्तीनंतर ६५-७० वर्षांपर्यंत करार पद्धतीने कामावर ठेवण्यास मंजुरी देते हि तर सरकारची मनमानीच म्हणावी लागेल यावर सरकारने व पक्ष-विपक्षांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे आणि सरकारने घेतलेला निर्णय चुकीचा असल्याने तो ताबडतोब मागे घ्यावा. असे चुकीचे निर्णय घेण्यापेक्षा राज्य सरकारने नियमित कर्मचारी व अधिकारी यांची भरती करावी.यामुळे बेरोजगारीवर आळा बसेल व बेरोजगारांना सरकारी सेवेत नौकरी करण्याची संधी मिळेल आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून केले जाईल.त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला कोणत्याही प्रकारची ठेच पोहचणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# राष्ट्रवादीच्या सामाजिक न्याय विभागाच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी सुबोधकुमार जाधव यांची तर जालना शहराध्यक्षपदी सुनील डोळसे यांची नियुक्ती





**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सामाजिक न्याय विभागाच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी सुबोधकुमार साळुबाजी जाधव यांची तर जालना शहराध्यक्षपदी सुनील सांडुजी डोळसे यांची नियुक्ती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी केली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक न्याय विभागाच्या मुख्य कार्यालयात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा मगरे यांनी श्री. जाधव आणि श्री.डोळसे यांना नियुक्तीपत्र दिले.

यावेळी जालना जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांची यावेळी उपस्थिती होती. या नियुक्ती बद्दल मित्रपरिवारातून श्री जाधव व श्री डोळसे यांचे अभिनंदन होत आहे.

# युतीसाठी शिवसैनिक व मनसैनिक आशावादी




राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत महाराष्ट्र हितासाठी व मराठी माणसांसाठी शिवसेनेबरोबर युतीचा विचार मांडल्याबरोबर महाराष्ट्रात चर्चांना उधाण आले.तर्क वितर्क लढवले जाऊ लागले.मनसे पक्ष हा शून्य आमदार आणि संपण्याच्या मार्गावर आहे अशी निर्भत्सना करणारे सरड्यानाही लाजवेल अश्या वृत्तीच्या नेत्यांनी आगामी निवडणुका पाहता व त्यात राज ठाकरे यांची काही ठिकाणी असलेली मतांची मक्तेदारी लक्षात घेता स्वतःचे राजकीय डावपेच सुरु केले.मागील प्रसंगानुरूप राज ठाकरे यांची बदललेली राजकीय भूमिका पाहता मनसे पक्ष अंधारात चाचपडतोय तो राज याना संपवायचा आहे काय ? दोन्ही ठाकरे बंधू हे मनस्वी स्वभावाचे आहेत त्यांच्या विचारांचा पगडा हा शिवसैनिक मनसैनिक आणि मराठी माणसाला आकृष्ट करतात.त्यांना संधीसाधूचे नेत्यांचे राजकारण व कोण किती महत्व व मोठेपणा देतो कसे राजकारण करतो त्याला आपण अनपेक्षितपणे बळी पडतो ह्याची प्रचिती त्यांचा भ्रमनिरास झाल्यावरच लक्षात येते.ठाकरे ह्या नावाचे वलय पाहता तमाम महाराष्ट्र व मराठी माणूस हा फक्त बाळासाहेब ठाकरे यांचीच अनभिषिक्त जागीर आहे आणि तशी वैचारिक बांधणी बाळासाहेबांनी केली असल्यामुळे मुंबई तुमची आणि भांडी घासा आमची म्हणणारांची वाचा बंद पडली होती.बाळासाहेब देहाने गेले पण त्यांचे विचार जिवंत आहेत ते टिकवण्याची जबाबदारी दोन ठाकरे बंधुंचीच होती ती आज टिकली आहे काय ह्याचा विचार गांभीर्याने केला पाहिजे.अमित शहा सारखा तडीपार गृहमंत्री अब बालासाहेब नही रहे खतम करो शिवसेनाको अशी दर्पोक्ती करून शिवसेनेची दोन शकले करण्यात यशस्वी होतो.दोन्ही पक्ष टिकवण्यात,वाढवण्यात व भाजपची नांगी मोडण्यात आपण कुठे कमी पडलो ह्याचा विचार गांभीर्याने करताना दिसत नाहीं.धूर्त नेते राज ह्यांना भेटून मनसे पक्षाला संशयाच्या भोवऱ्यात नेवून सोडतो तरी दोन्ही भावांना महाराष्ट्र हित आणि मराठी माणसांपेक्षा स्वतःचा अहंकार मोठा वाटतो हि खेदाची बाब आहे.दोघेही बंधू बाळासाहेब होऊ शकत नाहीं तरी त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे.आपल्याच अस्थनीत निखारे का निर्माण झाले,त्याला कारणीभूत कोण ? आता त्यावर उपाय काय ह्याचा विचार करून स्वगृही परत आणणार कि,अहंकार कुरवाळत बसणार ?. महाराष्ट्रात ठाकरे ब्रँड संपवण्यात भाजपला यशस्वी होऊ द्यायचे नाहीं ह्यासाठी शिवसैनिक व मनसैनिक हे जागोजागी युतीची होर्डिंग्स का लावत आहेत त्यामागची त्यांची अपेक्षित,गदगदीत भावना उद्धव आणि राज यांनी लक्षात घेऊन युती करावी. नेहमी प्रमाणे भ्रमनिरास करणार कि,नाहीं हे येणारा काळच सांगेल.जर युती झाली नाही तर शिवसेना काही अंशी टिकेल तर मनसे कायमची नेस्तनाबुत होईल आणि मुंबई तुमची आणि भांडी घासा आमची हे गुजरात्यांचे घोषवाक्य प्रत्यक्षात अनुभवायला मिळेल आणि भविष्यात हेच परभाषिक लोक शिवसैनिक आणि मनसैनिक यांनाच खळ्ळखट्याकचा प्रसाद देतील यात शंका नाहीं. भावी पिढी व मराठीचे अस्तित्व आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक प्रतिमा अखंडित ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील तमाम मराठी जनतेने,शिवसैनिक व मनसैनिक ह्यांनी उद्धव व राज ठाकरे ह्यांच्यावर युतीसाठी जोरदार दबाव आणून आपले कर्तव्य बजावावे.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई), मो. ९९२०७७६२७७**

पान १ वरुन

## पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ...

सात आठ दिवसा पासून विजेच्या जोरदार आवाज मुळे वातावरण मध्ये भीती निर्माण झाली असून या मुळे बरीच नुकसान झाल्याचे माहिती समोर आली आहे.

सुरवात ला पेरणी केलेल्या शेतकरी यांना पुन्हा दुबार पेरणी करावी लागते की काय शंका निर्माण झाली आहे. या भागात कपाशी सोयाबीन आणि मक्का हे प्रमुख पिके झाली असून सुरवातीला इतक्या पाऊसाची गरज नसून झालेला पाऊस शेतकरी साठी थोडा नुकसान दायक सांगत आहे. सुरू असलेल्या या पाऊसा मुळे आणि या भागात देळेगव्हान, गणेशपूर, टेंभुर्णी आंबेगाव, भातोडी सावंगी या भागातील सगळे पाऊसाचे पाणी या पूर्णा नदीला जाऊन मिळत असल्याचे या पूर्णा नदीच्या पात्रात चांगली पाणी आले असून हे सगळे पाणी खडकपूर्णा धरणात जाऊन मिळते या मुळे या धरणात पाणी येण्याची सुरू झाले असून आधीच या धरणात थोडे पाणी होते आणि आता चांगले पाणी वाढले असून जवळपास पन्नास टक्के पाणी झाले असल्याने या भागातील पुढील पाणी टंचाई होणार नाही असे संकेत आहे. आता पेरणी साठी वरून राजाने थोडा विसावा घेऊन कामे करून देण्याची साकडे शेतकरी राजा वरुण राजा ला करत आहे.

## मोदी सरकारच्या ...

माणसाला वैद्यकीय उपचारावर केल्या जाणा-या खर्चाची भिती वाटत असे. मोदी सरकारने ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध केले आहेत. पूर्वी आपल्याला अनेक वस्तूंची आयात करावी लागत असे, आता मात्र मेक इन इंडियामुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत. भारताच्या विकासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःकडे घेतले नसून १४० कोटी भारतीयांना याचे श्रेय दिले आहे ऑपरेशन सिंदूर मुळे सुरक्षित भारत, समृध्द भारत या मंत्राचा परिचय जगाला झाला आहे. भारतावर दहशतवादी मार्गाने हल्ला चढविला तर, दहशतवाद्यांच्या देशात घुसून जशास तसे उत्तर दिले जाईल, हे ऑपरेशन सिंदूर मुळे जगाला कळले आहे ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतात बनवलेल्या शस्त्रास्त्रांनी, क्षेपणास्त्रांनी मोठी कामगिरी बजावली आहे. भारतात तयार केलेल्या शस्त्रास्त्रांची पाकिस्तानात यशस्वी चाचणी झाल्यामुळे भारतात बनवलेल्या संरक्षण उत्पादनांची विश्वासार्हता जगात तयार झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्यानुसार गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्मान भारत, किसान सन्मान निधी अशा अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. श्री.दानवे यांनी यावेळी काही विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडत म्हणाले, काही नेते केवळ नुसते राजकारण करण्यात धन्यता मानतात. त्यांनी केवळ टीका करण्यापेक्षा विकासाच्या कामांवर लक्ष केंद्रित करायला हवे. आयत्या पिठावर रेघोट्या मारून श्रेय घेण्याचा प्रयत्न होणार नाही, याची जबाबदारी त्यांनी घ्यायला हवी. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या तत्त्वावर मोदी सरकारने आजवर काम केले आहे. आणि या वाटचालीत १४० कोटी भारतीयांचा सक्रिय सहभाग असल्यामुळेच भारत वेगाने प्रगती करत आहे, असे दानवे यांनी ठामपणे सांगितले. विकसीत भारताच्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेला भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे,जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे,सौ.विमलताई आगलावे, विजय कामड, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर भांदरगे,सौ.संध्याताई देठे,सौ.शुभांगीताई देशपांडे, सिध्दीविनायक मुळे, सोपानराव पेंढारकर, सुनिल खरे,महेश निकम, सतिष जाधव,अर्जुन गेही,धनराज काबलिये, शिवराज जाधव, शशीकांत घुगे, संजय डोंगरे, भगवान मात्रे, अमोल धानुरे, सुनिल पवार, विलास जऱ्हाड, विष्णु डोंगरे, बाबासाहेब कोलते, वसंत शिंदे, राजेंद्र भोसले, सतिष केरकळ, बबनराव सिरसाठ, देविदास देशमुख यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते व स्थानिक माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

## इंग्रजी माध्यमांच्या ...

भगवान धनगे, गणेश चव्हाण, तुकाराम पडघन, संजय चव्हाण, गणेश मेहेत्रे, राधेश्याम चौधरी, शिवहरी कांयदे, विजयकुमार खरात, आनंद वाघ, जनार्दन कुदर, सुधाकर डोईफोडे, बबन लंके यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### जालना संघर्ष समितीच्या संघर्षाला अखेर यश

# नांदेड ते फिरोजपूर नविन रेल्वे आजपासून सुरू; जालना रेल्वे स्टेशनवर लोको पायलटचे स्वागत

**जालना । प्रतिनिधी** - जालन्याहून दिल्लीला जाण्यासाठी रेल्वे सुरू करण्यासंबंधी जालना रेल्वे संघर्ष समितीच्या अनेक वर्षाच्या मागणीला यश आले असून उत्तर रेल्वेने गाडी नं.१४६२१ आणि १४६२२ या दोन रेल्वे फिरोजपूर कॅन्ट जंक्शन ते हजूर साहिब नांदेड नवीन साप्ताहिक एक्स्प्रेस सुरू केली आहे. त्यामुळे या रेल्वेचा नांदेड विभागातील तसेच जालना येथील प्रवाशांना फायदा होणार असून इतर गाड्यांवरील ताण कमी होणार आहे.



जालना येथून दिल्लीसाठी रेल्वे ऊपलब्ध करून द्यावी अशी जालना रेल्वे संघर्ष समितीची मागणी होती अखेर त्यांच्या संघर्षाला यश आले असून आज पासून सदरील नविन गाडी सुरू करण्यात आली. रेल्वे संघर्ष समितीच्या या संघर्षाला यश आल्याने संघर्ष समितीच्या सर्व सदस्यांनी आज दिनांक १५ रविवार रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास सदरील रेल्वे जालना स्टेशनवर आली असता लोको पायलट चे जंगी स्वागत करून रेल्वे विभागाचे आभार मानले. यावेळी माध्यम ांशी संवाद साधत असताना रेल्वे संघर्ष समितीचे महासचिव फेरोजअली मौलाना म्हणाले की सध्या ही गाडी साप्ताहिक असून निदान आठवड्यातून तीन दिवस तरी ही गाडी सुरू करावी अशी आमची पुढील मागणी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी संघर्ष समितीचे महासचिव फेरोज अली मौलाना, अशोक मिश्रा,डा. केदार करवा, अड. हरिश्चंद्र चौधरी,नितीन गणेशलाल चौधरी,सुरेश सदगुरे, सय्यद अफसर यांच्यासह ईतरांची ऊपस्थिती होती.

ही गाडी फिरोजपूर कॅन्ट जंक्शन येथून १३ जून रोजी दुपारी १.२५ वाजता सुटेल आणि फरीदकोट, कोट कपुरा जंक्शन, भटिंडा जंक्शन, दिल्ली-सफदरजंग, भोपाळ, इटारसी जंक्शन, खांडवा, मनमाड जंक्शन, औरंगाबाद, जालना,पूर्णा जंक्शन मार्गे हुजूर साहिब नांदेड येथे रविवार पहाटे ३.३० वाजता पोहोचणार आहे. परतीच्या प्रवासात ही गाडी हुजूर साहिब नांदेड येथून १५ जून रोजी ११.५० वाजता सुटेल आणि पूर्णा जंक्शन, जालना, औरंगाबाद, मनमाड जंक्शन, भुसावळ जंक्शन, दिल्ली-सफदर जंग, फरीदकोट मार्गे फिरोजपूर कॅन्ट जंक्शन येथे मंगळवारी पहाटे ४:३० वाजता पोहोचेल. या साप्ताहिक गाडीत द्वितीय श्रेणी वातानुकुलीत, तृतीय श्रेणी वातानाकुलीत, द्वितीय शय्या आणि जनरल असे २२ डब्बे असतील.

## जालना बस स्थानक परिसरात एकाला चापट बुक्क्यांनी मारहाण; घटना सीसीटिव्ही कमेऱ्यात कैद



**जालना । प्रतिनिधी** - पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहीतीनुसार जालना बस स्थानक परिसरात एकाला चापट बुक्क्यांनी मारहाण झालीय. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिनांक १३ रोजी कलम ११५ (२), ३५२,३५१(२),३(५) भारतीय न्याय संहीती नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी अधिक माहीती अशी की,सय्यद शोएब सय्यद रियाज (वय ३१ वर्ष) हे जालना बस स्थानक परिसरातील पेट्रोल पंप वर आपल्या गाडीमध्ये पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांना दुचाकीवर बसलेल्या दोन टवाळखोरांनी धक्काबुक्की करून चापट बुक्क्यांनी मारहाण केली. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. याप्रकरणी सय्यद शोएब सय्यद रियाज यांच्या फिर्यादीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### आ दानवे यांच्या माध्यमातून २५१ घरकुलाची मंजुरी

## लाभार्थ्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करावे - सरपंच सौ कापसे

**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण येथे २५१ घरकूलाना मंजुरी मिळाली असून देळेगव्हाण गावातील लाभार्थ्यांनी तातडीने संपूर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन सरपंच सौ वत्सलाबाई रामकीसन कापसे यांनी केले आहे.



जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण हे राजकीय दृष्टया अतिशय महत्वाचे असून माजी मंत्री रावसाहेब दानवे व विध्यमान आमदार संतोष दानवे यांनी या अगोदरही प्रधानमंत्री आवास योजनेतून शेकडो घरकुल मंजूर केले असून त्यांच्या माध्यमातून आताही २५१ घरकूलाना मंजुरी देण्यात आली आहे.मंजुरी मिळालेल्या घरकुल लाभार्थ्यांची यादी ग्राम पंचायत कार्यालयासमोर लावली असून संबधित लाभार्थ्यांनी घरकूला संबधित सर्व कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

यावेळी त्यांनी सांगितले की, ज्या लाभार्थ्यांचे नाव यादीत नाही , प्रतीक्षा यादीत नाही ,किंवा वगळली आहे त्यांनी नवीन सर्वेक्षणासाठी अर्ज सादर करावा ,विशेष म्हणजे ग्रामपंचायत कार्यालयाकडून नविन सर्वेक्षण करण्यात येणार असून प्रत्येक गरजूंना माजी मंत्री रावसाहेब दानवे, आमदार संतोष दानवे,जेष्ठ नेते, गोविंद पंडित जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित विशेषतः आमदार यांचे स्वीय सहाय्यक उद्धव दूनगहू यांच्या नेतृत्वाखाली गरजुना घरकुल मिळून देणार असल्याचे सरपंच सौ कापसे यांनी सांगितले.

### टेंभुर्णीत महिलांकडून वट पौर्णिमा आनंदात साजरी

## ग्रामपंचायतने वाढविला महिलाचा उत्साह; निर्माण केला स्पेशल सेल्फी पॉईंट

**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - सगळे सण काही ना काही संदेश देऊन हिंदू धर्मात वेगवेगळ्या सणाला महत्व आहे. वट पौर्णिमा हा सण महिलांच्या आवडीचा सण असून या दिवस भरपूर तैयार होऊन गावातील वडा भोवती पांढरा दोरा घेऊन फेरी मारून या झाडाला पूजा करून जन्मो जन्मी हाच नवरा/पती भेटू दे अशी प्रार्थना करून येथे आलेल्या सर्व महिला एक मेकिना भेटून त्याचा छोट्या खाणी हळदी कुंकू चा कार्यक्रम पार पडल्या जातात.आज बहुतांशी गावातील बऱ्याच वडाच्या झाडाला कित्येक किलो दोरा बांधल्या गेला असून ही पूजा सन महिला मंडळ कडून मोठ्या आनंदात आणि उत्सवात साजरा करण्यात आला. या वेळी ग्रामपंचायत जवळील असलेल्या वडाच्या झाडाजवळ या वट पौर्णिमा निमित्य एक भारदस्त रांगोळी काढून या ठिकाणी सेल्फी पॉइंट नक्की करून जणू ग्राम पंचायत ने आलेल्या महिला मंडळ यांचे फोटो सेशन चे काम सोपे करून या सोशल मिडिया च्या युगात महिलांची आवड लक्ष्यात घेता केलेले नियोजन बद्दल समाधान व्यक्त केले.





दीपसन रेमेडी




वृतपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग

वेब पोर्टल, युट्युब चॅनल

वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण

नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज

वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन

अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन

वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

परतूर येथे आमदार बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांच्या उपस्थितीत भाजपा कार्यकारणीसह विविध सेलची घोषणा

# परतूर नगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकवणारच - भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांचे विचार तळागाळातील प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची असून, सबका साथ सबका विकास सबका विश्वास हे मोदीजींचे ब्रीद ध्यानात घेऊन कार्यकर्त्यांसोबत समरस होत संघटना वाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी काम करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतुर येथे भाजपा च्या तालुका कार्यकारणी व विविध आघाड्या प्रकोष्ट च्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र वाटप समारंभ तसेच नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ नारायण कुचे यांच्या सत्कार सम ारंभ प्रसंगी बोलत होते

यावेळी व्यासपीठावर, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, परतूर मंडळाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले बद्रिनारायन ढवळे अशोकराव बरकुले महिला आघाडी तालुकाध्यक्ष छायाताई घोरबांड भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सतोनकर आदींची प्रमुख उपस्थिती होती

दरम्यान जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या सत्काराच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समि ती नगरपालिका महानगरपालिकेचे रणसिंग फुंकले असल्याची चर्चा जोरदारपणे चर्चिली जात होती

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की , आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती जालना महानगरपालिका व नगरपालिका निवडणुकीमध्ये आपल्या सगळ्यांना जिद्दीने उतरायचे असून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्ता मिळवायचे असल्याचे यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की

पक्ष संघटनेत काम करत असताना तुझा भाऊ न बाळगता कार्यकर्त्यांच्या माध्यमातून थेट तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे आमदार लोणीकर म्हणाली की, भारतीय जनता पार्टीची एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाच्या माध्यमातून विविध पदावर काम करण्याची संधी दिली जाते व त्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या सम स्या सोडवण्याचे काम पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून व्हावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली

पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार यांच्या माध्यमातून अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात असून या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले परम कर्तव्य असून हे करत असतानाच संघटनेत नवयुवक, युवतींना संघटनेत प्रवाहित करण्याची जबाबदारी ही आपली असल्याचे त्यांनी नमूद केले

यावेळी जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे म्हणाले की, पक्ष संघटनेचे काम करत असताना स्वतःला झोकून देत पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करून गावागावा पर्यंत संघटना पोहोचवत येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वच आघाड्यांवर भारतीय जनता पार्टीला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत रहावे, या माध्यमातून वाडी वस्ती झोपडपट्टीवरील कार्यकर्ता भारतीय जनता पार्टीच्या विचाराशी जोडण्यासाठी पोषक वातावरण तयार करून या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी पदाधिकाऱ्यांची असल्याचे सांगितले

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की , पदाधिकारी म्हणून आपली जबाबदारी चोखपणे निभावताना ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांची जाळे निर्माण करतानाच येणारी परतूर नगरपालिकेचे निवडणूक आपण जिंकणारच असा विश्वास व्यक्त केला

आपले सर्वांचे नेते आमदार बबनराव लोणीकर सक्षम असून, येणाऱ्या अडचणीवर मात करत आपल्याला प्रत्येकाला संघटनेला बळकटी देण्याचे काम करावयाचे असल्याचे त्यांनी नमूद केले

वंचित व शिवसेनेमधून अनेक कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काही लोक रस्ता चुकले होते त्यांनी वंचित बहुजन आघाडी शिवसेने मध्ये काम केले मात्र खरा न्याय भारतीय जनता पक्ष देऊ शकतो आमदार बबनराव लोणीकर घेऊ शकतात हे ध्यानात येताच अनेकांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आम दार नारायण कुचे यांचा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय जनता पार्टी कार्यकारणी, भाजप कार्यकारणी, ओबीसी मोर्चा कार्यकारणी, यासह सर्व प्रकोष्ट सेलच्या नूतन पदाधिकाऱ्यांना आमदार बबनराव लोणीकर आमदार नारायण कुचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आली

या कार्यक्रमाला भगवानराव मोरे दया काटे पंचायत समिती सदस्य दिगंबर मुजमुले शिवाजी पाईकराव प्रदीप ढवळे तुकाराम सोळंके भाजपा माणिकराव वाघमारे, परम ेश्वरा आकात बंडू मानवतकर गजानन लोणीकर,बंडू मानवतकर सिद्धेश्वर केकान, मधुकर मोरे , अमोल पवार, ज्ञानेश्वर सोळंके, गजानन लिपणे संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, दिनेश होलानी, ओम प्रकाश मोर, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, नरेश कांबळे, सुरेश काळे, भगवान आरडे, मधुकर मोरे, बाबाराव थोरात बबलू सातपुते आसिफ कच्वी नसरुल्ला काकड श्री गांजाळे सुरेश जगताप, विजय यादव गोपी ठाकूर सनी तनपुरे, मेरा खतीब विश्वंभर शेळके हनुमान चिखले अशोक भांडवले कैलास यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती

# जालना जिल्ह्यात आजपासून शैक्षणिक वर्षाची सुरूवात

शाळेच्या पहिल्या दिवशी होईल विद्यार्थ्यांचे स्वागत...



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आज ( दि १६) सोमवारपासून सुरु आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यात 'शाळा प्रवेशोत्सवा'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे.

शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि मुलांची उपस्थिती वाढवण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत संपूर्ण जिल्ह्यात 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाला उद्यापासून सुरुवात होणार असून शाळा शिक्षण उत्सव सुरू केल्या जाणार असल्याची माहिती ह्यूमन वेल्फेअर अँड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अब्दुल रफिक अब्दुल रशीद यांनी दिली आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढावी यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने विविध उपक्रम राबवावे आणि शिक्षण उत्सव साजरा करावा असा आवाहन अब्दुल रफिक अब्दुल रशीद यांनी केल आहे. दरम्यान, शाळांमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी वाढवण्यासाठी पालकांनी स्वतः विद्यार्थ्यांना शाळेत पाठवावे असही अब्दुल रफिक अब्दुल रशीद यांनी म्हटले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.